# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

## P.R.O Office, Palghar

Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com


प्रेसनोट दि.१८/०६/२०१८

# "कासा पोलीस स्टेशनने जपला माणूसकीचा वसा"

जन्मत:च दोन्ही हात नसलेला कल्पेश विलास दोडा रा.कल्लोळे जि.पालघर याने पायाने पेपर लिहून इयत्ता १० वीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून ७५.४० टक्के गुण घेतले आहेत. कल्पेश दोडा हा बेटेगाव आदिवासी विकास प्रकल्पाच्या आश्रम शाळेत शिक्षण घेतो जिद्द असली तर माणूस काय करू शकतो. याचे जिवंत उदाहरण कल्पेश दोडा जन्मत:च दोन्ही हात नसतांना पायाने पेपर लिहून इयत्ता १० वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्याची जिद्द बघून कासा पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचीत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश सोनवणे व कासा पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी स्वत:च्या पगारातून वर्गणी काढून कल्पेशला भविष्यातील शिक्षण घेण्यासाठी फुल ना फुलाची पाकळी म्हणून २१,०००/-रुपयांची मदत दिली. सदरची मदत पालघर जिल्हयाचे मा.अपर पोलीस अधिक्षक श्री.योगेश चव्हाण सो,यांनी कल्पेश व त्याचे आई वडीलांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला तसेच त्यांनी कल्पेश यास त्याला त्याच्या भविष्यात शिक्षणाकरिता कोणत्याही प्रकारची अडचण भासल्यास आमच्याशी संपर्क साधून अथवा प्रत्यक्ष भेटून त्याच्या अडचणीचे निवारण केले जाईल असे मनोगत व्यक्त करून त्याला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सदर आर्थिक मदतीचा हात व सत्कार बघून कल्पेश व त्याच्या आई वडीलांचे डोळे पाणावले अतिशय हृदयस्पर्शी प्रसंग असल्याचे त्यांनी सांगीतले तसेच समाजामध्ये कोणीही पुढाकार घेऊन आम्हाला मदत केली नाही.परंतू कासा पोलीसांनी माझ्या मुलासाठी केलेली मदत ही खरोखर लाखमोलाची असल्याची भावना कल्पेशच्या पालकांनी व्यक्त केली पोलीस हा समाजातील एक घटक असून त्यालाही भावना आहेत त्याचे हे मुर्तीमंत उदाहरण आहे.भविष्यात विविध संस्थंनी कल्पेशला मदत करावी असे आवाहन पोलीसांच्या वतीने करण्यात आले.

पोलीस विभागाने केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कासा पोलीस स्टेशनच्या पंचक्रोषीत प्रतिष्ठीत नागरीकांनी,व्यापारी वर्गातील लोकांनी,पत्रकारांनी,शांतता कमिटी सदस्यांनी मनापासून स्वागत केले.सदर कार्यक्रमात शालेय प्राध्यापक,शिक्षकवृंद,विदयार्थी – विदयार्थीनी तसेच ग्रामस्थ व कासा पोलीस स्टेशनचे अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.